# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः23.02.2026** **वारः सोमवार**

---

- **पंतप्रधानांच्या हस्ते मेरठमध्ये १२ हजार ९३० कोटी रुपये मूल्यांच्या विकास कामांसह मेट्रो आणि** नमो भारत रेल्वे ला हिरवा झेंडा
- इंडिया एआय इम्पॅक्ट परिषद, भविष्यात जगाच्या एआयच्या वापराच्या मार्गक्रमणातील महत्त्वाचा टप्पा असल्याचे पंतप्रधानांचे मन की बातमध्ये प्रतिपादन.
- महाराष्ट्रात आजपासून  अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सुरुवात, ६ मार्चला मुख्यमंत्री सादर करणार अर्थसंकल्प
- ७९व्या ब्रिटिश अकादमी पुरस्कार म्हणजेच बाफ्टामध्ये मणिपुरी चित्रपटाला बाल चित्रपट विभागात पुरस्कार

आणि

- आयसीसी पुरुष टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वकरंडक स्पर्धेत सुपर एट सामन्यात दक्षिण आफ्रिकेकडून भारताचा पराभव

**<u>पंप्र-मेरठ</u>**

पंतप्रधानांनी मेरठमधील १२ हजार ९३० कोटी रुपये मूल्यांच्या विविध विकास कामांचे उद्घाटन आणि राष्ट्रार्पण केले.  या विकास प्रकल्पांमुळे विकसित उत्तर प्रदेश आणि विकसित भारत यांना बळ मिळणार असल्याचे प्रतिपादन मोदी यांनी यावेळी बोलताना केले. त्याशिवाय पंतप्रधानांच्या हस्ते मेरठ मेट्रो आणि नमो भारत रेल्वेला हिरवा झेंडा दाखवण्यात आला. मेरठ मधील शताब्दी नगर नमो भारत स्थानकावरून धावणाऱ्या या मेट्रोमधून पंतप्रधानांनी प्रवासही केला. या प्रवासात त्यांनी विद्यार्थी, प्रवासी यांच्याशी संवाद साधला. पंतप्रधानांच्या हस्ते ८२ किलोमीटर लांबीच्या दिल्ली मेरठ नमो भारत मार्गिकेचे लोकार्पण तसंच भारताच्या पहिल्या नमो भारत प्रादेशिक जलद वाहातूक व्यवस्थेच्या उर्वरीत विभागांचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले. नमो भारत ही भारतातील पहिली प्रादेशिक जलद वाहतूक व्यवस्थेतील पहिली रेल्वे असून, ती महत्त्वाच्या शहरी केंद्राना जोडणारी वेगवान सेवा आहे.

पंप्रमकीबा

इंडिया एआय इम्पॅक्ट परिषद, भविष्यात जगाच्या एआयच्या वापराच्या मार्गक्रमणातील महत्त्वाचा टप्पा ठरल्याचे प्रतिपादन काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. आकाशवाणीवरील त्यांच्या मन की बात या देशवासियांशी संवादात त्यांनी अनेक देशांचे नेते, उद्योग नेतृत्व, नवोन्मेषक आणि स्टार्ट अप क्षेत्रातील संबंधित लोक या परिषदेसाठी एकत्र आल्याचे अधोरेखित केले. अनेक जागतिक नेत्यांना आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील मुख्य अधिकाऱ्यांना भेटण्याची संधी मिळाल्याचे पंतप्रधान म्हणाले. प्रदर्शनातील अमूल सहकारी दूध संघाच्या प्राण्यांवरील उपचारांसाठी, प्राण्यांवर देखरेखीसाठी एआयचा वापर आणि एआयच्या मदतीने प्राचीन भारतीय धर्मग्रंथांचे जतन करण्याचा प्रकल्प जागतिक नेत्यांचे लक्ष वेधून घेणारे ठरल्याचे नमूद केले.

**<u>एआयघोषणापत्र</u>**

इंडिया एआय इम्पॅक्ट परिषद २०२६मध्ये स्वीकारण्यात आलेल्या एआय इम्पॅक्टवरील दिल्ली घोषणापत्राला ८९ देश आणि आंतरराष्ट्रीय संघटनांनी मान्यता दिली आहे. आर्थिक विकास आणि सामाजिक हितासाठी एआयचा वापर करण्याबाबत जागतिक सहमती यांतून स्पष्ट होते. मान्यता देणाऱ्या देशांमध्ये बहुतांश सर्व मोठ्या अर्थव्यवस्था, आशियाई,अरब देशांचा समावेश आहे. जगभरातून या परिषदेमध्ये संबंधितांनी सहभाग दर्शवला.

**<u>समिटफसवणूक</u>**

दरम्यान, परिषदेतील सहभागींना फसवणुकीला बळी पडू नये असा इशारा केंद्र सरकारने दिला आहे. या संदर्भात आर्थिक परतफेड करण्याबाबत संवेदनशील माहिती मागणारे लघुसंदेश तसेच व्हॉटसअॅप संदेश प्रसारित केले जात असल्याचे इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने समाज माध्यमांवरील संदेशात नमूद केले आहे. हे संदेश अधिकृत नाहीत त्यामुळे सहभागींनी संवेदनशील माहिती सामाईक करू नये असे आवाहन मंत्रालयाने केले आहे.

**<u>राजाजीउत्सव</u>**

दिल्लीत राष्ट्रपती भवनामध्ये राजाजी उत्सवाचे उद्घाटन आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते होणार आहे. पंतप्रधानांनी काल मन की बातमध्ये, स्वतंत्र भारताचे पहिले गर्व्हनर सी. राजगोपालाचारी यांच्या पुतळ्याचे अनावरण होणार असल्याची माहिती दिली होती. ब्रिटिश स्थापत्यकार एडविन लुट्येन्स यांच्या पुतळ्याच्या जागी हा राजगोपालाचारी यांचा पुतळा उभारला जाणार आहे. या निमित्ताने उद्यापासून एका प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येणार आहे.

**<u>महाअर्थसंकल्प</u>**

महाराष्ट्रात आजपासून  अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सुरुवात होत आहे. अधिवेशनात ६ मार्चला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अर्थसंकल्प सादर करणार आहे. अधिवेशनात १५ विधेयके देखील मांडण्यात येणार आहेत. महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री आणि अर्थ मंत्री अजित पवार यांना अपेक्षित मुद्दे आणि सूचनांचा यामध्ये अंतर्भाव करण्यात येईल. तसंच सामान्य नागरिकांना दिलासा देणारा आणि राज्याची आर्थिक शिस्त राखणारा अर्थसंकल्प सादर केला जाईल असा विश्वास महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र

फडणवीस यांनी काल व्यक्त केला. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला मुंबईत आयोजित वार्ताहर परिषदेत काल ते बोलत होते.

**सीबीआयविमानअपघात**

महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताची सीबीआय चौकशी करण्याच्या सूचना देण्याची विनंती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना केली आहे. मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलताना त्यांनी ही माहिती दिली. या अपघाताविषयी असलेल्या सर्व शंका दूर करण्यासाठी सरकार प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. या संदर्भात महायुतीतील मित्र पक्ष राष्ट्रवादी काँग्रेसकडून या अपघाताची सीबीआय चौकशीची मागणी करणारे पत्र मिळाल्याचे सांगून या संदर्भात केंद्रीय गृह मंत्र्यांशी चर्चा झाल्याचे ते म्हणाले.

**अवयवदान-पूल-मंजिरी**

अवयवदान आणि प्रत्यारोपण क्षेत्रात भारतानं लक्षणीय टप्पा गाठला असल्याचं केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्र्यांनी काल सांगितलं. राष्ट्रीय अवयव आणि टिश्यू प्रत्यारोपण संघटनेनं देशभरात अवयवदान, गरजूंना अवयव उपलब्ध करून देण्यात आणि त्यांच्या प्रत्यारोपणात अभूतपूर्व प्रगती नोंदवली आहे. २०१३ ते २०२५ या कालावधीत अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रियांची संख्या चार पटींनी वाढून पाच हजारांवरून २० हजारांवर पोहोचली. सध्या केल्या जाणाऱ्या अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रियांमध्ये मृत दात्यांच्या अवयवांचं रोपण करण्याचं प्रमाण १८ टक्के असल्याचंही आरोग्य मंत्रालयानं म्हटलं आहे.

**बाफ्टापुरस्कार**

७९व्या ब्रिटिश अकादमी पुरस्कार म्हणजेच बाफ्टाचे वितरण काल झाले. या सोहळ्यात वन बॅटल आफ्टर अनादर या चित्रपटाने वर्चस्व गाजवले. या चित्रपटाने सर्वोत्कृष्ट चित्रपट पुरस्कारासह सहा पुरस्कार मिळवले. चित्रपटाचे दिग्दर्शक पॉल थॉमस अँडरसन यांना सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक म्हणून गौरवण्यात आलं. या पुरस्कारांमध्ये मणिपुरी विनोदी चित्रपट बुंग या फरहान अख्तर निर्मित चित्रपटाला सर्वोत्कृष्ट बाल आणि कुटुंब चित्रपट पुरस्काराने गौरवण्यात आले. या चित्रपटातून लक्ष्मीप्रिया देवी यांनी दिग्दर्शक म्हणून पदार्पण केले आहे.

**एफआयएच हॉकी**

ऑस्ट्रेलियात टास्मानिया हॉकी सेंटर इथं काल झालेल्या एफआयएच प्रो लीग सामन्यात २-२ अशी बरोबरी झाल्यानंतर पेनल्टी शूटआऊटमध्ये भारतीय पुरुष संघाला यजमान संघाकडून ५-४ अशी हार पत्करावी लागली. सामन्याच्या १५ व्या मिनिटाला आणि ४३ व्या मिनिटाला गोल नोंदवले. मात्र ऑस्ट्रेलियाच्या संघानं ४७ व्या आणि ५६ व्या मिनिटाला गोल करून बरोबरी साधली. सामन्याची निर्धारित वेळ संपेपर्यंत ही बरोबरी कायम राहिल्यानं सामना निर्णायक होण्यासाठी शूटआऊट फेरी घेण्यात आली.

**क्रिकेट**

आयसीसी पुरुष टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत काल अहमदाबाद इथं झालेल्या सुपर एट सामन्यात दक्षिण आफ्रिकेच्या संघानं भारतीय संघाचा ७६ धावांनी पराभव केला. दक्षिण आफ्रिकेनं प्रथम फलंदाजी स्वीकारत निर्धारित २० षटकात सात बाद १८७ धावा केल्या. त्यामध्ये डेव्हिड मिलरच्या तडाखेबंद ६३ धावांचा तसेच ट्रस्टन स्टब्जच्या ४४ धावांचा समावेश होता. या धावांचा पाठलाग करताना यजमान संघाचा डाव १८ षटकं आणि पाच चेंडूत १११ धावांवर आटोपला. मार्को जेसननं चार तर केशव महाराज यानं तीन गडी बाद करून आपल्या संघाच्या विजयात मोठा हातभार लावला. श्रीलंकेत पल्लेकेले आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या गट २ मधील आणखी एका सुपर एट  सामन्यात इंग्लंडनं श्रीलंकेवर ५१ धावांनी विजय मिळवला.

## **या बरोबरच हे बातमीपत्र संपलं नमस्कार.**